# सत्यप्रिय गांधारी

डॉ. सुमति क्षेत्रमाडे

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

A40

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**सत्यप्रिय गांधारी : डॉ. सुमति क्षेत्रमाडे**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ ४१०/-

# दोन शब्द

## १

रामायण आणि महाभारत हे दोन माझे अत्यंत आवडते ग्रंथ आहेत. आमच्या घरचे वातावरण धार्मिक. लहानपणी आईबरोबर रामाच्या देवळात कथाकीर्तनाला जात असे. कतेकरी, कीर्तनकरबुवा यांनी रंगवून सांगितलेल्या रामायण, महाभारत यांतील कथा मोठ्या तल्लीनपणे एकत असे. घरात पांडवप्रताप, वाल्मिकी रामायण, श्रीकृष्णचरित्र इत्यादी ग्रंथ होते. चातुर्मासात रात्री झोपी जाण्यापूर्वी आम्हा भावंडांना आळीपाळीने आईला काही वाचून दाखवावे लागे. त्यामुळे मन आपोआप संस्कारित होत गेलं. वाचनाची गोडी लागली. नकळत लेखनाची बीजे मनोभूमीत पडत गेली.

माझी 'मैथिली' कादंबरी १९६३ साली प्रकाशित झाली. आणि महाभारताचं थोडं थोडं वाचन सुरू केलं. हा प्रचंड ग्रंथ ठरावीक वेळेत वाचणं मला शक्य नव्हतं. 'महाभारत वाचन' हे कधी न संपणारं वाचन आहे. हे वाचन म्हणजे सूर्याची पृथ्वीभोवती प्रदक्षिणा. सूर्य मावळला म्हणजे तो संपल्यासारखा वाटतो. पण... संपलेला नसतो.

दिवसा वैद्यकीय व्यवसायात गुंतल्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी वाचन, पहाटे लेखन त्यामुळे विद्यार्थ्यांसारखं 'टाइमटेबल'बनवावं लागतं.

तसं पाहिलं तर लेखक हा जन्मभर विद्यार्थीच असतो.

महाभारतवाचन नेम चालू असतानाच ठरविलेल्या 'टाइमटेबल' प्रमाणे अन्य कादंबऱ्यांची टाचणे-टिपणे, पूर्वतयारी चालू होती. त्याचबरोबर अन्य साहित्यलेखनही सुरू होतं. दरम्यान 'अनुहार'(गौरांग महाप्रभू व विष्णुप्रिया), वादळबीज (मुक्ताबाई), 'तपस्या' (कुष्ठरोगावरील) इत्यादी बारा कादंबऱ्या आणि चौदा कथासंग्रह इतकं साहित्य वाचकांसमोर आलं. काहींच्या आवृत्त्याही निघाल्या.

## २

दोन तपाच्या दीर्घ काळानंतर आता महाभारत कथा 'सत्यप्रिय गांधारी' कांदबरीरूपाने वाचकांच्या भेटीस येत आहे.

महाभारत – मूळ महर्षीव्यास लिखित (यांत सौती आणि वैशंपायन यांनी थोडी भर घातली.) हा या पृथ्वीवरील एक अजोड, लोकात्तर आणि परिपूर्ण ग्रंथ आहे हे, हा ग्रंथ सतत वाचणाऱ्यांच्या सहज लक्षात येतं. जगात जे काही आहे ते सगळे या ग्रंथात आहे. म्हणूनच असे म्हटले जाते– 'व्यासोच्छिष्टम् जगत सर्वम्।'

या ग्रंथात भारतीय तत्त्वज्ञान, नीतिशांस्त्र, धर्मतत्त्वे, व्यवहारज्ञान, ज्योतिषशास्त्र, राजधर्म, उपनिषदे, गतयुगातल्या अनेक-कथा-उपकथा-अनेक चिरंतन तत्त्वे भरलेली आहेत. युगानुसार तपशिलात काही बदल होत गेले तरी मानवाच्या कल्याणार्थ असलेली मूळ तत्त्वे तीच आहेत आणि युगानयुगे तीच घेलेल्या कौरव आणि पांडव या चुलत भावांची भाऊबंदकी ! दोघांमधलं वैर !

तात्विकदृष्ट्या सत्य आणि असत्य, धर्म आणि अधर्म, नीती आणि अनीती, यामधला संघर्ष!

या संघर्षातून घडलेली कथा, उभे राहिलेले 'न भूतो न भविष्यति' असे महायुद्ध आणि त्याबरोबरच कुरुवंशाचा आणि पृथ्वीवरील क्षत्रियांचा संहार झाला. एक युगाचा अंत झाला. कलियुगाचा प्रारंभ झाला.

असे हे महाभारत-कुरुवंशाची कथा. या कथेतील प्रमुख पात्रे आहेत-भीष्म, धृतराष्ट्र, दुर्योधन, दु:शासन, कर्ण, शकुनी, द्रोणाचार्य, अश्वत्थामा आणि पाच पांडव भ्राते आणि विदुर. प्रमुख स्त्रीपात्रे आहेत गांधारी, कुंती आणि द्रौपदी. या कथेचा निर्माता-'बोलविता धनी वेगळाची' असा युगपुरुष श्रीकृष्ण!

३

महाभारताचे खंड पुन:पुन्हा वाचीत असताना ही प्रमुख पात्रे अखंड नजरेसमोर उभी राहत होती.

रामायणातील पात्रे सद्गुणांचा परिपाक असलेली अशी आदर्श आहेत.

महाभारत कथेतील पात्रे, आजही आपल्या सभोवार दिसणाऱ्या माणसांचेच विविध नमुने आहेत. महाभारत कथेत 'भाऊबंदकी'चा जो संघर्ष घडला तोच संघर्ष घराघरातून, कुटुंबाकुटुंबातून चाललेला दिसतो.

४

... ही कथा प्रत्यक्ष लिहायला सुरुवात करण्यापूर्वी तीन वेळा उत्तर भारताचा प्रवास घडला होता. गंगाकिनारी हिंडले होते. हृषिकेशला लक्ष्मणझूल्यानजीक गंगेच्या घाटावर मध्यरात्रीपर्यंत गंगामैय्याच्या निकट सान्निध्यात बूसन राहिले होते-एकटीच! मागे स्वामी शिवानंद यांच्या आश्रमातल्या खोलोत माझ्याबरोबरची प्रवासी मंडळी दिवसभराच्या पायपिटीने थकून गाढ झोपी गेली होती. त्यांच्याबरोबर हिंडूनही मला थकवा जाणवत नव्हता...

घाटाच्या तळपायारीवर बसले होते– पाण्यात पावलं बुडवून. भगीरथाने आणलेली गंगामय्या घनगंभीर आवाज करीत खळाळत वाहात होती...

ओम् नम: शिवाय!

भगीरथाने शंकराच्या जटाभारातून – गिरिशिखरावरून खाली भारतभूमीवर आणलेली – भारतभूमी सुजलाम्-सुफलाम–सुखी समृद्ध बनविण्यासाठी!

डावीकडची धूसर–अस्पष्ट हिमशिखरे!

नक्षत्रांनी खच्चून भरलेलं आकाश अक्षरश: खाली झुकलं होतं.

पलीकडे वाळूत एक कुत्रं शांत झोपी गेलं होतं...छे:! जप करीत समाधिस्थ झालं होतं.

सगळीकडे शांत–शांत!

हीच का ती परम शान्ती!

नजरेसमोर महाभारत उलगडत होते. हलके हलके पर्वामागून पर्वे नजरेसमोरून सरकत होती.

आश्रमवासिकपर्व नजरेसमोर स्थिर झालं. कथेचा धागा हाती आला.

माझ्या नित्याच्या पद्धतीप्रमाणे–कादंबरीचा चित्रपट हलके हलके तयार होत गेला. त्या चित्रपटात रंगून गेले. स्वत:लाच विसरले.

''तुम्ही इथं येऊन बसला आहात, होय! बिछान्यावर दिसला नाहीत.''

माझी समाधी खाडकन उतरली.

माझ्या एक सहप्रवासी भगिनी माझ्याजवळ उभ्या होत्या.

''म्हणजे रात्रभर इथेच बसून होतात तुम्ही?''

मी हसून म्हटलं, ''छे: हो! अहो, रात्री प्रवचन प्रसाद सारं आटपून खोलीत आले, तेव्हाच बारा वाजून गेले होते. चला.''

मनाशी म्हणत होते–'माझ्या जीवनातला हा एक दुर्मीळ योग!'

## ५

परतीच्या प्रवासात'महाभारत कथे'चे चित्र मन:पटलावर पूर्ण झाले होते. 'सत्यप्रिय गांधारी' कादंबरी लिहायला सुरुवात केली. मी कांदबरीसाठी हेच शीर्षक का निवडले?

कारण– गांधारी, कुंती आणि द्रौपदी या महाभारत कथेच्या महत्त्वाच्या आणि प्रमुख स्त्रिया असल्या तरी देवी गांधारी ही महाभारत कथेची प्रत्यक्ष साक्षिणी आहे. डोळ्यांवर पट्टी बांधलेली असली तरी अधिक डोळस आहे.

ती विवाह होऊन एकदा जी हस्तिनापुरच्या राजप्रासादात शिरली ती अगदी शेवटपर्यंत– वानप्रस्थाला जाईपर्यंत– त्या राजवाड्याबाहेर कधी पडली नाही.

तिचा पती सिंहासनाधिष्ठित धृतराष्ट्र जन्मांध होता. त्यामुळे विवाहमंडपात शिरण्यापूर्वीच आपल्या सुंदर तेजस्वी डोळ्यांवर पट्टी बांधलेली ही सत्यप्रिय पतिव्रता, अखंड आपल्या पतीजवळ त्याच्या सेवेत निमग्न असे.

धृतराष्ट्राच्या अंधत्वामुळे त्याच्या राजमंदिरातच नित्य छोटा दरबार भरत असे. वनवनांतरीचे ऋषिमुनी राजाला भेटायला येत. धृतराष्ट्र स्वत: विद्वान होता उपनिषदादी सर्व शास्त्रांचे त्याने अध्ययन केलेले होते. नित्य भेटीला येणाऱ्या ऋषिमुनींच्या अनेक कथा, पतिसेवेसाठी निकट असलेली गांधारी मनोभावे ऐकत असे. विविध मांडलिक राजे हस्तिनापूरच्या राजाच्या भेटीला येत, त्यांची बोलणीही पतिसमवेत असलेल्या गांधारीच्या कानी पडत असत. त्याशिवाय धृतराष्ट्राच्या सेवेसाठी सकाळ–संध्याकाळ नीतिज्ञ विदुर येऊन बसत असे. अनेक नीतिकथा सांगत असे. बुद्धिमान गांधारी त्या सगळ्या आत्मसात करीत होती.

गांधारी जात्याच बुद्धिमान होती. विचारी होती, 'बुद्धिमती गांधारी' असे महर्षीव्यास तिला अनेक वेळा संबोधीत असत, एवढंच नव्हे, तर त्यांनी तिला सांगून ठेवलं होते,

'बुद्धिमती स्नुषे, तुला जरुरी वाटेल तेव्हा तू माझं स्मरण कर, मी हजर होईन.'

श्रीकृष्णालाही गांधारीच्या बुद्धिमत्तेची, बहुश्रुतपणाची, संयमी आणि समतोल वृत्तीची चांगली जाण होती. युद्धाच्या पूर्वी शिष्टाई करण्यासाठी पांडवाकडून तो जेव्हा हस्तिनापुरी आला, तिथे दरबार भरला, तेव्हा त्याने म्हटले,

''गांधारीलाही बोलवा.''

'सत्य हाच धर्म' हे व्रत घेऊनच गांधारी, गांधार देशाहून हस्तिनापुरी आली होती. हे व्रत तिने आमरण पाळले.

युद्धाला निघण्यापूर्वी दुर्योधन मातेचा आशीर्वाद घेण्यासाठी आला, तेव्हा तिने स्पष्टपणे म्हटले,

''पुत्रा, असत्य सोड. धर्माने वाग.''

''माते, मला तुझा सल्ला नको. मला आशीर्वाद हवा आहे.''

तिने शांत स्वरात निर्धारपूर्वक म्हटले.

''तेच सांगते आहे. पुत्रा, जिकडे सत्य तिकडे जय. सत्य हाच जय! हाच माझा आशीर्वाद!''

# ६

गांधारी, कुंती आणि द्रौपदी या महाभारतातल्या प्रमुख राजस्त्रिया. पण या तिघीत गांधारी अत्यंत दुर्दैवी! दुर्दैवी स्त्रीच्या वाट्याला येतात, त्यापेक्षाही अधिक दु:खे तिच्या वाट्याला आली.

पाहा ना! वायव्य दिशेच्या डोंगराळ प्रदेशातल्या एका छोट्या राज्याच्या सुबल राजाची ही अत्यंत देखणी कन्या–निष्पाप, निर्दोष, निरागस! राजकीय डावपेच, अंत:पुरातल्या खटपटी–लटपटी कशाचाही गंध नाही. प्रखर शिवभक्त आसपासच्या राजघराण्यात विवाह होऊन जाणारी. सुखाने संसार करणारी...

पण–विधिलिखित!

हस्तिनापूरच्या युवराजाची मागणी घेऊन दूत येतो. कुरु घराण्याची कीर्ती–दबदबा–वैभव–! सुबल राजापेक्षा त्याचा कुटिल राजनीतीत मुरलेला, कपटी फार खेळण्यात पारंगत असलेला त्याचा ज्येष्ठ पुत्र– गांधारीचा ज्येष्ठ बंधू शकुनी हस्तिनापूरच्या वैभवाला लोभावतो तिकडे जायला उतावीळ झालेला असतो.

तो पुढाकार घेतो. विवाह ठरतो. त्याच्या कपटनीतीला इथूनच प्रारंभ होतो.

आपला पती जन्मांध आहे, हे गांधारीला फार उशिरा कळले. कळले तेव्हा मागे फिरण्याची वेळ निघून गेले होती. शकुनीचा 'डाव' तिच्या लक्षात आला केवढं दुर्दैव!

सत्याप्रमाणेच पातिव्रत्य हा आपला धर्म आहे, हे मानणारी गांधारी डोळ्यांवर पट्टी बांधून हस्तिनापुरी–विवाह–मंडपात आली.

आणि तिच्या करुण कथेला व आंतरिक दु:खाला सुरुवात झाली.

पती जन्मांध, ही नैसर्गिक आपत्ती सहन करता येईल. पण हा अंथ दृष्ट, अत्यंत संशयी, धरसोड वृत्तीचा, दुटप्पी धोरणाचा, स्वार्थाने भरलेला.

पतीसन्निध राहिल्यामुळे–नित्य कथा ऐकत असल्यामुळे, गांधारीही राजकारणकुशल बनली होती. प्रसंगविशेषी कधी ती पतीला योग्य तो सल्ला देऊ लागली, तर तो अंध पती मानभंग करून फणकारून म्हणे,

''स्त्रियांना राजकारणात काही कळत नाही. गप्प बैस.''

विवाहानंतर राजमंदिरात प्रवेश केल्यावर, तिच्याबरोबर आलेल्या वृद्ध दाईकरवी तिने शकुनीला निरोप पाठवला–

''तुझे इथले कार्य आटोपले आहे. तू आता आपल्या देशी परत जा.''

पण तो गेला नाही.

## ७

पंडूच्या मृत्यूनंतर कुंती कुमार पांडवांना घेऊन हस्तिनापुरी आली. दुर्योधनादी कौरवांच्या मत्सराला–द्वेषाला सुरुवात झाली. पांडवांच्या नाशाच्या योजना सुरू झाल्या. दुर्योधन, दुःशासन हे दोघे बंधू, कर्ण आणि शकुनी ही चांडाळ चौकडी पांडवांच्या नाशार्थ खटपटीला लागली. या चौघांतला प्रमुख सूत्रधार शकुनी.

गांधारीने अनेक वेळा धृतराष्ट्राला विनवणी करून सांगितले होते–

''माझ्या या कपटी भावाने आमच्या तिकडची आसपासची अनेक राज्ये कपटी फासे टाकून धुळीला मिळवली आहेत.

... महाराज, माझ्या या भावाला हवं तेवढं विपुल धन द्या आणि त्याला परत पाठवा. हा कुरुवंशाचा नाश करील.''

पण धृतराष्ट्राने पुत्रप्रेमाधीन झाल्यामुळे, गांधारीचं म्हणणं कधी ऐकलं नाही.

सबंध आयुष्यभर तिच्या वाट्याला सुखाचे दिवस कधी आलेच नाहीत. पतिप्रेम नाही. पुत्रप्रेमही कधी मिळालं नाही. हस्तिनापूरची ती सम्राज्ञी होती. राजमंदिर दास–दासींनी गजबजलेले होते. कुणालाही हेवा वाटावा अशी विपुल संपत्ती होती.

पण आयुष्यभर असत्याच्या वातावरणात सत्याचा पाठपुरावा करीत, पतीची धरसोड वृत्ती, त्याच्या दुष्ट मनातले हेवेदावे, त्याचे दुट्टपी धोरण सगळे काही सहन करीत, जे जे अनर्थ घडत होते, ते पाहत ती एकाकी राहिली.

शंभर पुत्रांची ही माता. पण अपत्यप्राप्तीच्या बाबतीतही निसर्गाने हिची क्रूर चेष्टा केली.

विवाहानंतर तिला दिवस गेले. गर्भ राहिला. पण तो विकृत निघाला. त्याचा गोळा बनला. नऊ महिन्यांचा काळ केव्हाच उलटून गेला होता. पण मूल वाढत असल्याची हालचाल नाही. गोळा वाढत होता. तिकडे वनगृही कुंतीला तिच्या बरोबरच दिवस गेले होते– ते भरले आणि सूर्यनारायणासारखा तेजस्वी पुत्र झाल्याचे वृत्त आले. पण गांधारीचा गर्भ–गोळा वाढतच होता. आणखी काही काळ लोटला. तिच्या अनुभवी वृद्ध दाईने अनेक उपाय केले, पण व्यर्थ! सर्व बाजूंनी आपलं दुर्दैव उभं राहिलं आहे याची तिला खंत वाटली. स्त्रीच्या सगळ्या दुःखात मातृहीनतेचं दुःख असह्य असतं.

तिकडे कुंती पुन्हा गरोदर राहिल्याचे वृत्त आले. पण हिचा गोळा पोटातच वाढत होता. शेवटी वृद्ध दाईकडून तो गोळा तिने पाडला.

आणि त्याच वेळी अंतर्ज्ञानी-सर्वज्ञात महर्षी व्यास तिथे उपस्थित झाले. त्यांनी त्या गोळ्यातून निघालेल्या शंभर-नव्हे, एकशेएक गर्भांड्यातून विशिष्ट प्रयोगद्वारे शंभर पुत्र आणि एक कन्या निर्माण केली.

आज ट्यूब बेबी-डिश् बेबीचे यशस्वी प्रयोग करणाऱ्या अत्याधुनिक वैद्यक शास्त्रज्ञांना भगवान व्यास महर्षींचा हा प्रयोग, संशोधनाचा एक विषय आहे.

कुंतीचा दुसरा पुत्र भीम ज्या दिवशी जन्मला त्याच दिवशी दुर्योधनाचा आणि त्यापाठोपाठ बाकी कौरव पुत्रांचा व कन्येचा जन्म झाला.

८

श्रीकृष्णाची शिष्टाई फुकट गेली. युद्ध अटळ झाले. सुरू झाले. युद्धाचे वृत्त संजय रोज धृतराष्ट्राला सांगत होता. पतीसन्निध बसलेली गांधारी ते वत्त ऐकत होती.

ती पतीला सांगत होती, ''महाराज, हे युद्ध थांबवा. अधर्माने होणारा नाश टाळा. हे राज्य पंडूने वाढवले आहे. त्याचा हिस्सा त्याच्या मुलांना द्या. आता तरी सत्याने वागा...''

पंडूने राज्य वाढवले, सरकारी खजिना द्रव्याने भरून टाकला आहे हे ती जाणत होती.

अलीकडे काहींनी म्हटले आहे,

''पंडू पंडूरोगी होता, दुर्बल होता.'' पण तसा तो नव्हता. कुंतीच्या स्वयंवरात वरमाला घातलेला पंडू कसा होता, त्याचे सत्य समग्र वर्णन महाभारतात आदिपर्वातल्या संभव पर्वात आहे.

पण तिचे म्हणणे पुत्रप्रेमामुळे धृतराष्ट्राने मनावर घेतले नाही,

आणि पुढचे सगळे भवितव्य सत्याश्रयी गांधारीने जाणलेच होते.

९

अठरा दिवसांत युद्ध संपले. सर्व संहार झाला. मैलोन्‌मैल पसरलेल्या कुरु रक्षक्षेत्रावर धारातीर्थी पतन पावून, स्वर्गप्राप्ती झालेल्या अठरा अक्षौहिणी सैन्याचा खच पडला होता.

पुत्रशोकाने विदीर्ण झालेली गांधारी दुःखाने खचून गेली.

रणक्षेत्रावर पडलेल्या सगळ्यांचे अंत्यदर्शन घेण्याची आपली इच्छा तिने श्रीकृष्णाजवळ प्रकट केली. त्याने ती पूर्ण केली. आपल्या प्रखर पातिव्रत्याने आणि

सत्य-धर्माने डोळ्यांवरच्या पट्टीतूनही पाहण्याची दिव्यदृष्टी तिला लाभली. कुरुक्षेत्रावर मरण पावलेल्या प्रत्येकाला पाहत, ती यथायोग्य उद्गार काहित होती.

ती सहनशील होती. संयमी होती. तरीसुद्धा मानवीच होती. तिचं हृदय स्त्रीचं होतं.

सगळा नाश नजरेने पाहिल्यावर, आपला अनिवार संताप आवरीत तिने निग्रहपूर्वक म्हटले,

''कृष्णा, या सगळ्या नाशाला तू कारणीभूत आहेत, तेव्हा तुझ्या समस्त यादवकुलाचा असाच संहार होईल, असा मी तुला शाप देते.''

श्रीकृष्ण क्षणभर गंभीर झाले. म्हणाले,

''गांधारी, तू महापतिव्रता आहे. 'सत्य हाच धर्म' या व्रतापासून तिळमात्र कधी विचलित झाली नाहीस. तेव्हा तुझा हा शाप सत्यच ठरेल. तो मी आनंदाने स्वीकारतो.''

मग किंचित हसून श्रीकृष्णाने म्हटले,

''मला माहीत असलेली गोष्टच तू मला पुन्हा सांगते आहेस.''

तिने मृदु स्वरात म्हटले,

''श्रीकृष्णा, तू कोण आहेस हे मीही जाणते आहे.''

**१०**

सर्व संहार होऊन युधिष्ठिर हस्तिपूरच्या राज्यावर आल्यानंतर, काही वर्षांनी ती धृतराष्ट्राला घेऊन वानप्रस्थाश्रमी जाण्यासाठी हस्तिनापूरच्या राजमंदिराबाहेर पडली, तेव्हा तिचा गुदमरलेला जीव मोकळा झाला. एक युग-द्वापरयुग संपलेच होते. तिचे दुःखही आता संपले होते.

महाभारत पुन्हा पुन्हा वाचताना-मला जशी ती दिसली-जाणवली तशी ती माझ्या वाचकांपुढे आणीत आहे.

यात, कादंबरीत रेखाटलेली इतर प्रमुख पात्रे- महर्षी व्यासांनी जशी रेखाटली आहेत, तशीच तिथून उचलून मी या कादंबरीत ठेवली आहेत. त्याच्या मूळ व्यक्तिमत्त्वाला मी कुठेही यत्किंचितही धक्का लावण्याचे वृथा धाष्ट्यं दाखवलेले नाही.

माझ्या 'मैथिली' प्रमाणेच माझी ही 'गांधारकन्या गांधारी' वाचकांना आवडेल अशी आशा आहे.

कळावे.

१ जानेवारी १९८७ **सुमती क्षेत्रमाडे**